श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG- 11.19 चतुर्थ सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।

उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।

देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।

प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

एकादशः स्कन्धः

॥ अथ एकोनविं(म्)शोऽध्यायः ॥

श्रीभगवानुवाच

यो विद्याश्रुतसम्पन्न, आत्मवान् नानुमानिकः ।

मायामात्रमिदं(ञ्) ज्ञात्वा, ज्ञानं(ञ्) च मयि सं(न्)न्यसेत् ॥ 1॥

श्री भगवान म्हणतात -फक्त तर्कांवर अवलंबून न राहता ज्याने उपनिषदादी शास्त्रांचे ज्ञान प्राप्त करून आत्मसाक्षात्कार करून घेतला आहे ,त्याने हे विश्व ही केवळ माझ्यावर भासणारी माया आहे हे जाणून नंतर ते ज्ञान सुद्धा माझ्यात सोडून द्यावे.

ज्ञानिनस्त्वहमेवेष्टः(स्), स्वार्थो हेतुश्च सं(म्)मतः।

स्वर्गश्चैवापवर्गश्च, नान्योऽर्थो मदृते प्रियः ॥ 2॥

ज्ञानी पुरुषांचे ध्येय ,फळ 'त्याच्या प्राप्तीचे साधन स्वर्ग आणि मोक्ष सुद्धा मीच आहे. माझ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही पदार्थावर तो प्रेम करीत नाही.

ज्ञानविज्ञानसं(म्)सिद्धाः, पदं(म्) श्रेष्ठं(वँ) विदुर्मम ।

ज्ञानी प्रियतमोऽतो मे, ज्ञानेनासौ बिभर्ति माम् ॥ 3॥

ज्ञान आणि विज्ञानाने संपन्न असलेले सिद्ध पुरुषच माझ्या खऱ्या स्वरूपाला जाणतात .म्हणून ज्ञानी मला सर्वांपेक्षा अधिक प्रिय आहे . ज्ञानी पुरुष ज्ञानाने मला आपल्या अंतकरणात धारण करतो .

तपस्तीर्थं(ञ्) जपो दानं(म्), पवित्राणीतराणि च ।

नालं(ङ्) कुर्वन्ति तां(म्) सिद्धिं(यँ), या ज्ञानकलया कृता ॥ 4॥

ज्ञानाच्या एका अंशाने सुद्धा जी सिद्धी मिळू शकते ,ती तपश्चर्या 'तीर्थयात्रा ,जप जाप्य,दान किंवा अन्य कोणत्याही पवित्र क्रियांनी पूर्णपणे मिळत नाही.

तस्माज्ज्ञानेन सहितं(ञ्), ज्ञात्वा स्वात्मानमुद्धव ।

ज्ञानविज्ञानसम्पन्नो, भज मां(म्) भक्तिभावितः ॥ 5॥

म्हणून उद्धवा !तू ज्ञान सहित आत्मस्वरूपाला जाणून घे आणि नंतर ज्ञान विज्ञान आणि संपन्न होऊन भक्ती भावाने माझे भजन कर.

ज्ञानविज्ञानयज्ञेन, मामिष्ट्वाऽऽत्मानमात्मनि ।

सर्वयज्ञपतिं(म्) मां(वँ) वै, सं(म्)सिद्धिं(म्) मुनयोऽगमन् ॥ 6॥

मुलींनी ज्ञान विज्ञान रूपयज्ञाने आपल्याच अंतःकरणात असलेल्या सर्व यज्ञांचा अधिपती अशा मला उद्देशून यज्ञ करून परमसिद्धी मिळविली आहे.

त्वय्युद्धवाश्रयति यस्त्रिविधो विकारो,

मायान्तराऽऽपतति नाद्यपवर्गयोर्यत् ।

जन्मादयोऽस्य यदमी तव तस्य किं(म्) स्यु-

राद्यन्तयोर्यदसतोऽस्ति तदेव मध्ये ॥ 7॥

हे उद्धवा !देह ,इंद्रिय व देवता यांचा समुदाय असलेले हे शरीर ही केवळ माया आहे .हे आधी व शेवटी नसून मध्येच असते .जन्म इत्यादी सहा विकार सुद्धा याचेच असतात .जे आधी असत नाही, शेवटी असत नाही ,ते मध्येही असत नाही. अशा या शरीराशी तुझा काय संबंध आहे ?

उद्धव उवाच

ज्ञानं(वँ) विशुद्धं(वँ) विपुलं(यँ) यथैत-

द्वैराग्यविज्ञानयुतं(म्) पुराणम् ।

आख्याहि विश्वेश्वर विश्वमूर्ते,

त्वद्भक्तियोगं(ञ्) च महद्विमृग्यम् ॥ 8॥

उद्धव म्हणाला -हे विश्वेश्वरा !हे विश्व मुर्ते !आपण विशुद्ध ,विपुल आणि सनातन तसेच वैराग्य आणि विज्ञान आणि युक्त अशा ज्ञानाचे वर्णन केले .आता महापुरुष जे समजून घेण्याचा प्रयत्न करतात, त्या भक्ती योगा विषयी मला सांगावे.

तापत्रयेणाभिहतस्य घोरे,

सं(न्)तप्यमानस्य भवाध्वनीश ।

पश्यामि नान्यच्छरणं(न्) तवाङ्घ्रि-

द्वन्द्वातपत्रादमृताभिवर्षात् ॥ 9॥

हे प्रभो !या घोर संसार मार्गावर मी तिन्ही तापांनी होरपळून अत्यंत दुःखी झालो आहे .अशावेळी आपल्या छत्रासारख्या चरण कमलांना शरण जाण्याखेरी दुसरा कोणताही उपाय मला दिसत नाही. कारण आपले हे चरण कमलच अमृताचा वर्षाव करून शरणागताना अभय देणारे आहेत.

दष्टं(ञ्) जनं(म्) सं(म्)पतितं(म्) बिलेऽस्मिन्,

कालाहिना क्षुद्रसुखोरुतर्षम् ।

समुद्धरैनं(ङ्) कृपयाऽऽपवर्ग्यैर्-

वचोभिरासिं(ञ्)च महानुभाव ॥ 10॥

हे महानुभाव !मी या संसार रूप विहिरीत शूद्र विषय रूप पाण्याने सुखोपभोग रूप तहान भागवण्यासाठी आलो व तीत पडलो .तिथेच कालरूपी सर्पा ने मला दंश केला. आता आपणच कृपा करून याला वर काढा आणि याला मुक्त करणाऱ्या आपल्या अमृतवाणीने ओलाचिंब करून टाका.

श्रीभगवानुवाच

इत्थमेतत् पुरा राजा, भीष्मं(न्) धर्मभृतां(वँ) वरम् ।

अजातशत्रुः(फ्) पप्रच्छ, सर्वेषां(न्) नोऽनुशृण्वताम् ॥ 11॥

श्रीकृष्ण म्हणाले - असेच हे पूर्वी अजातशत्रू   युधिष्ठिराने धार्मिक शिरोमणी भीष्मांना विचारले होते .त्यावेळी आम्ही सर्वजण तेथे उपस्थित होतो.

निवृत्ते भारते युद्धे, सुहृन्निधनविह्वलः ।

श्रुत्वा धर्मान् बहून् पश्चान्- मोक्षधर्मानपृच्छत॥ 12॥

भारतीय युद्ध संपल्यावर धर्मराज आपल्या आप्तेष्टांच्या संवाराने शोक वि व्हळ झाला होता .तेव्हा त्याने भीष्मांकडून पुष्कळ धर्मांचे विवरण ऐकल्यानंतर, मोक्षाच्या साधनांसंबंधी प्रश्न विचारला होता.

तानहं (न्) तेऽभिधास्यामि, देवव्रतमुखाच्छ्रुतान् ।

ज्ञानवैराग्यविज्ञान- श्रद्धाभक्त्युपबृं(म्)हितान् ॥ 13॥

त्यावेळी भीष्मानच्या तोंडून ऐकलेले धर्म मी तुला सांगतो ,ते ज्ञान ,वैराग्य 'श्रद्धा आणि भक्तीने परिपूर्ण आहेत.

नवैकादश पं(ञ्)च त्रीन्, भावान् भूतेषु येन वै ।

ईक्षेताथैकमप्येषु, तज्ज्ञानं(म्) मम निश्चितम् ॥ 14॥

उद्धवा! ज्या ज्ञानाने ,प्रकृती ,पुरुष , महत्तत्व , अहंकारआणि पंचतन्मात्रा ही नऊ, पाच ज्ञानेन्द्रिय, पाच कर्मेंद्रिये आणि एक मन ही  अकरा ,पाच महाभुते आणि तीन गुण ही आठ 'अशी ही एकूण 28 तत्वे सर्व कार्यांमध्ये आहेत ,तसेच या सर्वांमध्ये एकच परमात्मा व्यापून आहे ,असे पाहिले जाते, तेच परोक्ष ज्ञान होय ,हे माझे निश्चित मत आहे.

एतदेव हि विज्ञानं(न्), न तथैकेन येन यत् ।

स्थित्युत्पत्त्यप्ययान् पश्येद्, भावानां(न्) त्रिगुणात्मनाम् ॥ 15॥

ही 28 तत्वे न पहाता त्यात व्यापून असलेले एक परमात्मा तत्वच अनुभवणे याला विज्ञान (साक्षात्कार )म्हणतात .तसेच त्याच तत्वापासून त्रिगुणात्मक पदार्थांची उत्पत्ती ,स्थिती व लय होतात ,हे जाणावे.

आदावन्ते च मध्ये च, सृज्यात् सृज्यं(यँ) यदन्वियात् ।
पुनस्तत्प्रतिसं(ङ्)क्रामे, यच्छिष्येत तदेव सत् ॥ 16॥

अशा प्रकारे जे परमात्म तत्व सुरुवातीला आणि शेवटी असते ,तेच एका कार्यातून दुसऱ्या कार्यात अनुस्यूत होत राहते .आणि प्रलय काळी उत्पन्न झालेले सर्व आपल्यांमध्ये विलीन करून घेतल्यावर शेवटी जे शिल्लक राहते, तेच 'सत् 'तत्व होय.

श्रुतिः(फ्) प्रत्यक्षमैतिह्य- मनुमानं(ञ्) चतुष्टयम् ।
प्रमाणेष्वनवस्थानाद्, विकल्पात् स विरज्यते ॥ 17॥

वेद ,प्रत्यक्ष ,इतिहास आणि अनुमान या चारही प्रमाणांनी भेद बुद्धीचे अस्तित्व सिद्ध होत नाही. म्हणून विवेकी पुरुष भेद बुद्धीचा त्याग करतो.

कर्मणां(म्) परिणामित्वा- दाविरि(ञ्)चादमं(ङ्)गलम्।
विपश्चिन्नश्वरं(म्) पश्येद- दृष्टमपि दृष्टवत् ॥ 18॥

जसे या लोकातील भोग नाशवान आहेत ,त्याप्रमाणे यज्ञादीकर्मांच्या फलस्वरूप मिळणारी स्वर्गादीब्रह्मलोकापर्यंतची सर्व सुखे अमंगल ,दुःखदायी आणि नाशवान आहेत ,असे विवेकी माणसाने जाणावे.

भक्तियोगः(फ्) पुरैवोक्तः(फ्), प्रीयमाणाय तेऽनघ ।
पुनश्च कथयिष्यामि, मद्भक्तेः(ख्) कारणं(म्) परम् ॥ 19॥

हे पुण्यशील उद्धवा !भक्ती योगाचे स्वरूप मी तुला यापूर्वीच सांगितले आहे ;परंतु तो ऐकण्याची तुला अतिशय आवड आहे .म्हणून मी तुला पुन्हा माझी भक्ती प्राप्त होण्याचे श्रेष्ठ साधन सांगतो.

श्रद्धामृतकथायां(म्) मे, शश्वन्मदनुकीर्तनम् ।
परिनिष्ठा च पूजायां(म्), स्तुतिभिः(स्) स्तवनं(म्) मम ॥ 20॥

माझ्या अमृतमय कथांविषयी श्रद्धा ठेवावी .नेहमी माझ्या गुणांचे आणि नामांचे संकीर्तन करावे. माझी पूजा करण्यात अत्यंत निष्ठा ठेवावी आणि स्तोत्रांच्याद्वारे माझी स्तुती करावी.

आदरः(फ्) परिचर्यायां(म्), सर्वाङ्गैरभिवन्दनम् ।
मद्भक्तपूजाभ्यधिका, सर्वभूतेषु मन्मतिः ॥ 21॥

माझ्या सेवेमध्ये आदर ठेवावा .मला साष्टांग नमस्कार करावा .माझ्या भक्तांची पूजा विशेष रीतीने करावी आणि सर्व प्राण्यांमध्ये मला पाहावे.

मदर्थेष्वं(ङ्)गचेष्टा च, वचसा मद्गुणेरणम् ।

मय्यर्पणं(ञ्) च मनसः(स्) सर्वकामविवर्जनम् ॥ 22॥

आपले सर्व व्यवहार फक्त माझ्यासाठीच करावे वाणीने माझ्याच गुणांचे वर्णन करावे आणि आपले मन मलाच अर्पण करून सर्वकामना सोडून द्याव्यात.

मदर्थेऽर्थपरित्यागो, भोगस्य च सुखस्य च ।

इष्टं(न्) दत्तं(म्) हुतं(ञ्) जप्तं(म्),मदर्थं(यँ) यद् व्रतं(न्) तपः ॥ 23॥

धन भोग आणि सुखाचा माझ्यासाठी त्याग करावा आणि यज्ञ दान हवन जप व्रत आणि तप असे सर्व काही माझ्यासाठीच करावे.

एवं(न्) धर्मैर्मनुष्याणा- मुद्धवात्मनिवेदिनाम् ।

मयि सं(ञ्)जायते भक्तिः(स्), कोऽन्योऽर्थोऽस्यावशिष्यते ॥ 24॥

उद्धवा ! जे लोक या धर्मांचे पालन करून मला समर्पित होतात ,त्यांच्या हृदयामध्ये माझ्या भक्तीचा उदय होतो .मग त्याला आणखी काय मिळायचे शिल्लक राहणार?

यदाऽऽत्मन्यर्पितं(ञ्) चित्तं(म्), शान्तं(म्) सत्त्वोपबृं(म्)हितम्।

धर्मं(ञ्) ज्ञानं(म्) सवैराग्य- मैश्वर्यं(ञ्) चाभिपद्यते ॥ 25॥

धर्मांचे अशाप्रकारे पालन करण्याने शिकता मध्ये सत्वगुणाची वृद्धी होते आणि ते शांत होऊन आत्मचिंतन करू लागते .त्यावेळी भक्ताला धर्म ज्ञान वैराग्य आणि ऐश्वर्य स्वतःहून प्राप्त होते.

यदर्पितं(न्) तद् विकल्पे, इन्द्रियैः(फ्) परिधावति ।

रजस्वलं(ञ्) चासन्निष्ठं(ञ्), चित्तं(वँ) विद्धि विपर्ययम् ॥ 26॥

तेच मन जेव्हा मिथ्या प्रपंचात रमून इंद्रियांसह इकडे तिकडे भरकटू लागते ,तेव्हा ते चित्तरजगुणाने व्यापून नश्वर विषयांत गुंतते .तेव्हा त्याची स्थिती वरील स्थितीच्या उलट होते.

धर्मो मद्भक्तिकृत् प्रोक्तो, ज्ञानं(ञ्) चैकात्म्यदर्शनम् ।

गुणेष्वसं(ङ्)गो वैराग्य- मैश्वर्यं(ञ्) चाणिमादयः ॥ 27॥

उद्धवा !ज्याच्यामुळे माझी भक्ती उत्पन्न होते ,तोच धर्म होय .ज्यामुळे ब्रह्म आणि आत्मा यांच्या एकतेचा साक्षात्कार होतो .तेच ज्ञान होय .विषयांपासून अलिप्त राहणे हेच वैराग्य होय आणि अणिमादीसिद्धी हेच ऐश्वर्या होय.

उद्धव उवाच

यमः(ख्) कतिविधः(फ्) प्रोक्तो, नियमो वारिकर्शन ।

कः(श्) शमः(ख्) को दमः(ख्) कृष्ण, का तितिक्षा धृतिः(फ्) प्रभो ॥ 28॥

उद्धवाने विचारले -हे रिपू सु दना !यम आणि नियम किती प्रकारचे आहेत ?हे श्रीकृष्णा ! शम म्हणजे काय ? दम म्हणजे काय ?हे प्रभो !तितिक्षा आणि धैर्य ,हे काय आहे ?

किं(न्) दानं(ङ्) किं(न्) तपः(श्) शौर्यं(ङ्), किं(म्) सत्यमृतमुच्यते ।

कस्त्यागः(ख्) किं(न्) धनं(ञ्) चेष्टं(ङ्), को यज्ञः(ख्) का च दक्षिणा ॥ 29॥

पुंसः(ख्) किं(म्)स्विद् बलं(म्) श्रीमन् , भगो लाभश्च केशव ।

का विद्या ह्रीः(फ्) परा का श्रीः(ख्),किं(म्) सुखं(न्) दुःखमेव च ॥ 30॥

दान ,तपश्चर्या ,शौर्य , सत्य , ऋत ,त्याग ,कल्याणकारी धन ,यज्ञ आणि दक्षिणा यांचे स्वरूप काय आहे ?श्रीमान केशवा !पुरुषाचे खरे बळ कोणते ?भग आणि लाभ म्हणजे काय ?विद्या ,लज्जा ,श्रेष्ठ श्री, तसेच सुख व दुःख हे काय आहे ?

कः(फ्) पण्डितः(ख्) कश्च मूर्खः(ख्), कः(फ्) पन्था उत्पथश्च कः ।

कः(स्) स्वर्गो नरकः(ख्) कः(स्)स्वित् , को बन्धुरुत किं(ङ्) गृहम् ॥ 31॥

क आढ्यः(ख्) को दरिद्रो वा,कृपणः(ख्) कः(ख्) क ईश्वरः ।

एतान् प्रश्नान् मम ब्रूहि, विपरीतां(म्)श्च सत्पते ॥ 32॥

पंडित आणि मूर्ख यांची लक्षणे कोणती ?सन्मार्ग आणि कुमार म्हणजे काय ?बंधू कोणाला मानावे ?घर म्हणजे काय ?धनवान कोण आणि निर्धन कोण ?कंजूस कोण आहे ?ईश्वर कोणाला म्हणतात ?हे भक्तवत्सल प्रभो !आपण माझ्या या प्रश्नांची उत्तरे द्या .त्याचबरोबर यांच्या विरोधी जे पदार्थ आहेत ,त्यांच्याविषयीही सांगा.

श्रीभगवानुवाच

अहिं(म्)सा सत्यमस्तेय- मसं(ङ्)गो ह्रीरसं(ञ्)चयः।

आस्तिक्यं(म्) ब्रह्मचर्यं(ञ्) च, मौनं(म्) स्थैर्यं(ङ्) क्षमाभयम् ॥ 33॥

शौचं(ञ्) जपस्तपो होमः(श्), श्रद्धाऽऽतिथ्यं(म्) मदर्चनम् ।

तीर्थाटनं(म्) परार्थेहा, तुष्टिराचार्यसेवनम् ॥ 34॥

एते यमाः(स्) सनियमा, उभयोर्द्वादश स्मृताः ।

पुं(म्)सामुपासितास्तात, यथाकामं(न्) दुहन्ति हि ॥ 35॥

श्रीकृष्ण म्हणाले - अहिंसा ,सत्य,चोरी न करणे ,आ सक्ती नसणे ,लज्जा ,असंग्रह, आस्तिकता, ब्रह्मचर्य,मौन, स्थिरता, क्षमा आणि अभय हे 'यम ' होत. अंतः शुद्धी बहिःशुद्धी ,जप ,तप,हवन ,श्रद्धा ,अतिथी सेवा 'माझी पूजन ,तीर्थयात्रा ,परोपकार ,संतोष आणि गुरुसेवा ,हे ' नियम '. अशाप्रकारे यम आणि नियम या दोन्हींची संख्या प्रत्येकी 12 आहे .हे उद्धवा !जे लोक यांचे पालन करतात ,त्यांना आहे त्यांच्या इच्छेनुसार फळे देतात.

शमो मन्निष्ठता बुद्धेर्- दम इन्द्रियसं(यँ)यमः।

तितिक्षा दुःखसं(म्) मर्षो, जिह्वोपस्थजयो धृतिः ॥ 36॥

बुद्धी माझ्या ठायी स्थिर करणे म्हणजेच 'शम 'होय .इंद्रियांच्या संयमाचे नाव ' दम 'आहे .दुःख सहन करण्याला 'तितिक्षा 'म्हणतात .जीव आणि जननेंद्रिय यांच्यावर विजय मिळविणे हेच 'धैर्य 'होय.

दण्डन्यासः(फ्) परं(न्) दानं(ङ्), कामत्यागस्तपः(स्) स्मृतम् ।

स्वभावविजयः(श्) शौर्यं(म्), सत्यं(ञ्) च समदर्शनम् ॥ 37॥

सर्वांना अभय देणे हेच परम ' दान'आहे .कामनांचा त्याग म्हणजेच ' तप '. आपल्या वाचनांवर विजय मिळविणे म्हणजेच ' शूरता ' .सम दर्शन हे ' सत्य 'होय.

ऋतं(ञ्) च सूनृता वाणी, कविभिः(फ्) परिकीर्तिता ।

कर्मस्वसं(ङ्)गमः(श्) शौचं(न्), त्यागः(स्) सं(न्)न्यास उच्यते ॥ 38॥

मधुर भाषणाला महात्म्यांनी ' ऋत 'म्हटले आहे .कर्मामध्ये आसक्त न होणे म्हणजेच ' पावित्र्य ' .कामनांचा त्याग हाच 'संन्यास '.

धर्म इष्टं(न्) धनं(न्) नृणां(यँ), यज्ञोऽहं(म्) भगवत्तमः ।

दक्षिणा ज्ञानसन्देशः(फ्), प्राणायामः(फ्) परं(म्) बलम् ॥ 39॥

धर्म हेच माणसाचे कल्याणकारी 'धन 'आहे .मी परमेश्वर ' यज्ञ 'आहे .ज्ञानाचा उपदेश करणे म्हणजेच ' दक्षिणा 'होय .प्राणायाम हेच श्रेष्ठ ' बळ 'होय.

भगो म ऐश्वरो भावो, लाभो मद्भक्तिरुत्तमः ।

विद्याऽऽत्मनि भिदाबाधो, जुगुप्सा ह्रीरकर्मसु ॥ 40॥

माझे ऐश्वर्य च ' भग 'आहे .माझी भक्ती हाच उत्तम ' लाभ 'आहे .जिच्यामुळे ब्रह्म आणि आत्मा यांमधील भेद नाहीसा होतो ,तीच खरी 'विद्या 'समजावी .पाप करण्याची घृणा वाटणे ,याचेच नाव ' लज्जा 'असे आहे.

श्रीर्गुणा नैरपेक्ष्याद्याः(स्), सुखं(न्) दुःखसुखात्ययः ।

दुःखं(ङ्) कामसुखापेक्षा, पण्डितो बन्धमोक्षवित् ॥ 41॥

निरपेक्षता इत्यादी गुणच ' श्री 'होय .सुखदुःखाच्या पलीकडे जाणे म्हणजेच 'सुख'. विषयांची कामना हेच ' दुःख 'समजावे आणि बंधन व मोक्षाचे तत्व जाणणे हेच ' पांडित्य' होय.

मूर्खो देहाद्यहं(म्)बुद्धिः(फ्), पन्था मन्निगमः(स्) स्मृतः ।

उत्पथश्चित्तविक्षेपः(स्), स्वर्गः(स्) सत्त्वगुणोदयः ॥ 42॥

नरकस्तमउन्नाहो, बन्धुर्गुरुरहं(म्) सखे ।

गृहं(म्) शरीरं(म्) मानुष्यं(ङ्), गुणाढ्यो ह्याढ्य उच्यते ॥ 43॥

शरीर इत्यादींना ' मी 'मानणारा तो ' मूर्ख 'होय .माझी प्राप्ती करून देतो ,तोच खरा ' मार्ग 'होय .चित्ताची बहिर्मुखता हाच ' कुमार्ग 'होय .सत्वगुणाचे वृद्धी म्हणजेच ' स्वर्ग 'आणि सखया !नमो गुणाचे वृद्धीच 'नरक 'होय .गुरुच खरा ' बंधू 'होय आणि तो गुरु मी आहे .हे मनुष्य शरीर हेच खरे ' घर 'आहे .तसेच जो गुणांनी संपन्न आहे ,तोच 'धनवान 'समजावा.

दरिद्रो यस्त्वसन्तुष्टः(ख्), कृपणो योऽजितेन्द्रियः ।

गुणेष्वसक्तधीरीशो, गुणसं(ङ्)गो विपर्ययः ॥ 44॥

जो  असंतुष्ट असतो ,तो 'दरिद्री 'होय .इंद्रिये ताब्यात नसलेला तो ' कृपण 'होय. ज्याची चित्तवृत्ती विषयांमध्ये आसक्त नाही ,तोच 'ईश्वर ' .याच्या उलट जो विषयांमध्ये आसक्त आहे 'तोच 'असमर्थ'.

एत उद्धव ते प्रश्नाः(स्), सर्वे साधु निरूपिताः ।

किं(वँ) वर्णितेन बहुना, लक्षणं(ङ्) गुणदोषयोः ।

गुणदोषदृशिर्दोषो, गुणस्तूभयवर्जितः ॥ 45॥

उद्धवा !तू जितके प्रश्न विचारले होतेस ,त्या सर्वांची मी उत्तरे दिली .गुण आणि दोषांची वेगवेगळी लक्षणे मी तुला किती म्हणून सांगू ?सगळ्यांचा सारांश एवढाच की ,गुण आणि दोष पाहत राहणे हाच सर्वात मोठा दोष आहे आणि गुणदोषांकडे दृष्टी न देणे आज सर्वात मोठा गुण होय.

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायामेकादशस्कन्धे एकोनविं(म्)शोऽध्यायः ॥

॥ अध्याय एकोणिसावा समाप्त ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

